



Title Code- MAHMAR-51647

# दैनिक निडर निर्भिड जनसंचलन

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!






संपादक : जितेंद्र कायस्थ

Mob- 9822720784

Email- jansanchlan@gmail.com

वर्ष ३ रे अंक : २८९ वा शनिवार दि. १८ जानेवारी २०२५ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# महाभ्रष्टाचारी प्रकाश बोथेंना बसला दैनिक जनसंचलनचा जोरदार दणका

## बुलढाणा जिल्हा रुग्णालयाच्या सेवेतून केले कायमचे बडतर्फ

**जनसंचलन/बुलढाणा**

महाराष्ट्रभर गाजत असलेला बुलडाणा जिल्हा सामान्य रुग्णालयात बोकाळलेल्या कोट्यवधी रुपयांच्या भ्रष्टाचार प्रकरणी दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज सातत्याने संघर्ष करीत असून, हा भ्रष्टाचार जनतेसमोर आणण्याचे काम करीत आहे. गेल्या अनेक महिन्यांच्या संघर्षानंतर अखेर सिटी न्यूज व दैनिक जनसंचलनला यश आले असून, जिल्हा रुग्णालयातील महाभ्रष्टाचारी भांडारपाल प्रकाश नामदेव बोथे यांच्यावर सेवेतून बडतर्फीची कारवाई करण्यात आली आहे. यापुढील काळात बोथेंच्या अडचणी आणखी वाढण्याची शक्यता आहे. कारण त्यांच्यावर फौजदारी कारवाई करून त्यांना गजाआड पाठवण्यासाठी दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज सातत्याने प्रयत्न करीत राहणार आहे. गेल्या सुमारे दीड वर्षापासून सातत्याने दैनिक जनसंचलन येथील जिल्हा रुग्णालयात झालेल्या विविध प्रकारच्या भ्रष्टाचार प्रकरणी आवाज उठवण्याचे काम करीत आहे. जिल्हा रुग्णालयात कार्यरत राहून प्रकाश नामदेव बोथे यांनी अत्यंत बेशरमपणे आणि बेबंदपणे भ्रष्टाचार केला. कनिष्ठ लिपिक असलेल्या बोथे यांनी विविध तिकडमबाज्या करून भांडारपाल या पदावर आपली नियुक्ती करवून घेतली. या पदावर पोहोचण्यासाठीही बोथेंनी भ्रष्टाचार केला. परंतु भांडारपाल या पदावर पोहोचल्यानंतर बोथेंनी एव्हढ्या गतीने भ्रष्टाचार सुरू केला की, त्या भ्रष्टाचाराला कुठेही सीमाच नाही राहिली. बोथे यांच्या भ्रष्टाचारासंदर्भात काही सामाजिक कार्यकर्ते व दैनिक जनसंचलन व सिटी न्यूजने जोरदारपणे आवाज उठवल्यानंतर या प्रकरणी एक विभागीय चौकशी समिती बसवण्यात आली. चौकशी समितीसमोर जी धक्कादायक माहिती समोर आली, ती पाहून समितीच्या सदस्यांचेही डोके चक्रावून गेले. कारण बोथेंचा भ्रष्टाचार हा फारच वरच्या पातळीवर गेला होता.बोथेंनी भांडार विभागात कार्यरत असताना सेंट्रल पाईपलाईनमध्ये भ्रष्टाचार, कार्यालयीन फर्निचर खरेदीत भ्रष्टाचार, कुलर्स, इलेक्ट्रिक मोटर्स खरेदीत भ्रष्टाचार, बायोमेडिकल वेस्ट मॅनेजमेंट सिस्टीमच्या खरेदीत भ्रष्टाचार, व्हेंटिलेटर खरेदी, ऑक्सिजन कॉन्संट्रेटर, स्प्रे पंप खरेदीच्या निविदेत भ्रष्टाचार,, एक्सरे युनिट खरेदीत भ्रष्टाचार, डायलेसीस मशीन खरेदीत भ्रष्टाचार केला. कुठल्याही खरेदी त्यांनी नियमानुसार होऊ दिल्या नाहीत. खरेदी केलेल्या वस्तूंची बिले, फायली व्यवस्थित मेंटेन केली नाही. म्हणजे आपला भ्रष्टाचार उघड होऊ नये, यादृष्टीने बोथे यांनी पुरेपूर काळजी घेतली. बोथेंचा भ्रष्टाचार मांडायचा झाला, तर त्यावर एखादे पुस्तकच लिहावे लागेल, एव्हढ्या प्रमाणात या भ्रष्टाचाराची व्याप्ती आहे. कोंबडा कितीही झाकून ठेवला, तरी सूर्य उगवायचा राहत नाही, हा वाक्प्रचार बोथे विसरले असावेत कदाचित. त्यांना वाटले आपण भ्रष्टाचार करतो, त्यातून प्रचंड पैसे कमावतो आणि स्वतः:ची बेनामी संपत्ती खरेदी करतो, हे कुणालाही कळणार नाही. परंतु सिटी न्यूज व दैनिक जनसंचलनसारखे खंबीर आणि भ्रष्टाचाराविरोधात लढणारे वृत्तपत्र असल्या कारणाने बोथेंची सगळी कृष्णकृत्ये समोर आली. बोथे हे भ्रष्टाचार करून एव्हढे मस्तवाल झाले होते की, त्यांनी सातत्याने चौकशी समितीसमोर येण्यास देखील टाळाटाळ केली होती.दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज केवळ बातमी छापूनच थांबले नाहीत तर या भ्रष्टाचाराच्या विरोधात थेट मंत्रालयापर्यंत माहिती पोहोचवण्याचे काम केले. सामाजिक कार्यकर्ते चंद्रकांत खरात यांच्या याशिवाय वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे सातत्याने पाठपुरावा देखील केला. आरोग्य उपसंचालकांकडे सातत्याने मागणी लावून धरली. कारण विद्यमान आरोग्य उपसंचालक हेच बोथेंच्या भ्रष्टाचाराची चौकशी करणाऱ्या समितीत होते. वारंवार त्यांच्यावरही दबाव




आणण्याचा प्रयत्न केला. या सर्वांच परिणाम हा झाला की, १० जानेवारी रोजी आरोग्य उपसंचालकांनी एक पत्र काढून प्रकाश बोथे यांना महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ च्या कलम ५ (१) (९) मधील तरतुदींनुसार दोषी आढळल्यामुळे सेवेतून कायमचे बडतर्फ केले. या प्रकरणी आता बोथे यांच्यावर फौजदारी कारवाईसाठी दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज सातत्याने प्रयत्न करणार आहे. जोपर्यंत प्रकाश नामदेव बोथे राहणार अकोला यांच्यासारखे भ्रष्टाचारी गजाआड जात नाहीत, तोपर्यंत दैनिक जनसंचलन शांत बसणार नाही.जिल्हा रुग्णालयातील भ्रष्टाचार प्रकरणात आणखीही बरेच जण दोषी आहेत. प्रकाश बोथे यांच्यासह त्या भ्रष्टाचाऱ्यांवरही कारवाई करण्यासाठी आगामी काळात दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज सातत्याने लढण्याचे काम करणार आहे.

अजून बरेच काही पुढील भागात...

# भाऊ -भाऊ वैरी!

## एक कोटीच्या वादातून एकाचा खून!

**जनसंचलन/ शेगाव**

भावा-भावात वाद होत असतो परंतु तो इतकाही विकोपाला जाऊ नये! मात्र शेगाव तालुक्यातील माटरगाव बुद्रुक येथे जिगाव प्रकल्पाच्या निधीमुळे भावाने आपल्याच भावाला यमसदनी धाडले आहे.ही घटना भर दिवसा आता थोड्या वेळापूर्वी घडली. शत्रुघ्न मिरगे यांचा भास्थन येथील रहिवाशी भावानेच गेम केला. जिगांव प्रकल्प मध्ये जमीन गेल्याने दोन्ही भावांना पैसे मिळणार होते. प्रत्येकांचा १ कोटी १३ लाख असा हिस्सा असल्याचे सांगण्यात येत आहे. ते मिळाले. या पैशाच्या वादातून संशयित आरोपी सोपान मिरगे याने टोकाची भूमिका घेत थेट खूनच करून टाकला. वाद दरम्यान महिला जखमी झालेल्या आहेत.खून करणारा मृताकाचा चुलत भाऊ असल्याचे सांगण्यात येत आहे.



# काळजाचे तुकडे होणारा अपघात!

**जनसंचलन/ शेगाव**

अपघातांची मालिका सुरूच आहे.शेगाव तालुक्यातील जास्तगाव फाट्याजवळ टिप्पर आणि मोटरसायकलचाअपघात होऊन एक जण जागीच ठार झाला.हा अपघात एवढा भीषण होता की अपघातग्रस्तांचे तुकडे जमा करावे लागल्याने पाहणाऱ्यांच्या काळजाचे तुकडे- तुकडे झाले आहे. मृतक शेगाव तालुक्यातील मनसगाव येथील आहेत. पुंजाजी बावणे जागीच ठार झाल्याची माहिती सूत्रांनी दिली.संजय बावणे व दैनेश्वर कोठे गंभीर जखमी झाले आहेत.हा अपघात कसा झाला



आणि या अपघाताला कारणीभूत कोण हे प्रश्न अनुत्तरीत असले तरी, या अपघाता संदर्भातील अपडेट आज वेळोवेळी प्रसारित करणार आहोत.

# आपत्ती व्यवस्थापनासाठी ३०० आपदा मित्रांची प्रशिक्षणासाठी निवड होणार

## इच्छुक युवकयुवतींना नाव नोंदणी करण्याचे आवाहन...

जनसंचलन/ बुलढाणा

राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांच्या संकल्पनेतून संपूर्ण देशभरात आपदा मित्र ही योजना राबवण्यात येत आहे. यासाठी बुलढाणा जिल्ह्यातील ३०० आपदा मित्र प्रशिक्षणासाठी निवड करण्यात येणार आहे. आपदा मित्र प्रशिक्षणासाठी इच्छुक युवक युवतींनी गुगल लिंकवर नाव नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हा आपत्ती व्यवस्थापान प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी यांनी केले आहे. आपत्ती दरम्यान प्रथम प्रतिसादकर्ता हा नेहमी स्थानिक रहिवासी असतो. यास्तव स्थानिक स्तरावर उद्भवणाऱ्या अपत्तींना तात्काळ प्रतिसाद देण्याकरीता स्थानिक लोकांना आपत्ती व्यवस्थापन विषयक प्रशिक्षण देउन सक्षम करणे हे या योजनेचे मुळ उदिष्ट आहे. या योजनेच्या माध्यमातुन जीवितहानी कमी करणे, समाजात आपत्ती व्यवथापन विषयक जनजागृती करणे व आपत्तीला प्राथमिक स्तरावर प्रतिसाद देण्याकरिता मनुष्यबळ तयार करणे अशा अनेक बाबी साध्य होणार आहेत.

राज्य शासनाने १६ जिल्ह्यात राज्य शासनांमार्फत आपदा मित्र प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्याबाबत मान्यता दिलेली आहे. त्यानुसार बुलढाणा जिल्ह्यात ३०० आपदा मित्र प्रशिक्षणासाठी तयार करण्यात येणार आहे. या आपदा मित्रांना शासनाकडून निवड करण्यात येणाऱ्या यंत्रणेमार्फत आपत्ती व्यवस्थापन विषयांबाबत १२ दिवसाचे निवासी प्रशिक्षण देण्यात येईल. प्रशिक्षणाकरिता वय वर्ष १८ ते ४५ या गटातील शरिरिक व मानसीकदृष्ट्या सक्षम असलेल्या सामान्य नागरिक, महाविद्यालयीन विद्यार्थी, अशासकीय संघटना (एनजीओ), अशा वर्कर्स, अगणवाडी सेविका, शासकीय व निमशासकीय कर्मचारी इत्यादी यांचा समावेश असेल. तथापि, डॉक्टर, माजी सैनिक, स्थापत्य अभियंता यांच्याकरिता वयोमर्यादा ५५ वर्षापर्यंत राहील (मात्र त्यांना अपघात विमा सुविधा अनुज्ञेय राहणार नाही.) सदर नोंदणी करतांना इच्छुक महिलाचा समावेश करण्याबाबतही नमुद आहे. या प्रशिक्षण कार्यक्रमात सहभाग नोंदविणाऱ्या आपदा मित्रांना विहित करण्यात आलेले १२ दिवसांचे प्रशिक्षण पुर्ण केल्यानंतर शासनाकडून ३ वर्षाकरीता आपत्ती समयी शोध व बचाव कार्य करतांना अपघात झाल्यास रु. ५ लाख मर्यादेत अपघात विमा तसेच वैयक्तीक आपत्कालीन प्रतिसाद कर्ता संच पुरविण्यात येईल. याकरिता जिल्ह्यातील इच्छुक युवक-युवती, महिला,पुरुष, स्वंयसेवक यांनी संबंधित तहसिल कार्यालयात नैसर्गिक आपत्ती विभागाशी संपर्क करुन आपली नोंदणी करावी. अधिक माहिती करीता जिल्हा आपत्ती व्यवस्थापना विभागास ७०२०४३५९५४/ ९०११७७७२२३ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधून :https://docs.google.com/spreadsheets/d/1rNaSbpt1wQiQdH9bVp3naEKs3miCHs-9v3Se5xw/edit?usp=sharing 11933935/?= या गुगल लिंकवर संपूर्ण माहिती भरावी. सदर माहिती २२ जानेवारी, २०२५ पर्यंत जिल्हा नियंत्रण कक्ष, . किंवा_ . या ईमेल आयडीवर पाठविण्यात यावी, असे आवाहन करण्यात येत आहे.

# ६८ व्या राष्ट्रीय शालेय लॉन टेनिस स्पर्धे करिता महाराष्ट्र संघ झारखंड (रांची) येथे रवाना...

जनसंचलन/बुलढाणा

झारखंड (रांची) येथे दिनांक १७ जानेवारी ते १९ जानेवारी, २०२५पर्यंत होऊ घातलेल्या राष्ट्रीय शालेय स्पर्धे करिता मुली व मुले महाराष्ट्र संघ दिनांक १५ जानेवारी, २०२५ रोजी अकोला येथून रवाना झाला. संघामध्ये महाराष्ट्र मधील पुणे, मुंबई, कोल्हापूर, नागपूर, विभागातील खेळाडूंचा समावेश आहे. संघ रवाना होण्यापूर्वी मलकापूर येथे सराव शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. संघा व्यवस्थापक म्हणून राज्य क्रीडा मार्गदर्शक डॉ. जीवन मोहोड, संघ मार्गदर्शक ओंकार साठे व राधिका या रवाना झाले. संघाला जिल्हा क्रीडा अधिकारी .बी.एस. महानकर, राज्य क्रिडा मार्गदर्शक लाडगे, क्रीडा अधिकारी धारपवार, संदीप केळे यांनी स्पर्धेकरिता शुभेच्छा दिल्या.

# जिल्हा सैनिक कार्यालय येथे अशासकीय पदभरती

जनसंचलन/बुलढाणा



जिल्हा सैनिक कार्यालय बुलढाणा करीता माजी सैनिक/ इतर प्रवर्गातुन तात्पुरत्या स्वरुपात मानधनावर कंत्राटी पध्दतीने सैनिकी मुलांचे वसतिगृह चौकीदार (अशासकिय)- एक पद भरावयाचे आहे. या पदाकरीता इच्छुक सैन्यदलातील सेवानिवृत्त झालेल्या व इतर नागरीकाकडून २० जानेवारी २०२५ पर्यंत अर्ज मागविण्यात येत आहेत. वैयक्तिक अर्जासोबत अर्जदाराने आधार कार्ड, पॅन कार्ड, बॅंक पास बुक व १० वी पास प्रमाणपत्र (छायांकित प्रत)/ अर्जदार माजी सैनिक असल्यास पीपीओ, डिस्चार्ज बुक, ओळखपत्र जोडावे

# आठवडाभरात पिकविम्याचे पैसे न मिळाल्यास आक्रमक आंदोलन

## रविकांत तुपकरांचा इशारा, पुणे येथे कृषी आयुक्तालयात अधिकाऱ्यांना भरला दम...

जनसंचलन/बुलढाणा

शेतकऱ्यांना पिक विमा मिळवून दिल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही, अशी ग्वाही रविकांत तूपकर यांनी दिलेली आहे. दिलेल्या शब्दाप्रमाणे रविकांत तुपकर अद्यापही शांत बसलेले नाहीत, कधी मुक्काम आंदोलन, कधी ठिय्या,कधी मंत्री महोदयांशी चर्चा या माध्यमातून पिकविम्यासाठी रविकांत तुपकर यांचे जोरदार प्रयत्न सुरू आहेत. दरम्यान आज १७ जानेवारी रोजी त्यांनी पुणे येथे कृषी आयुक्तालयात पिक विम्याच काम पाहणारे मुख्य सांख्यिकी यांची भेट घेऊन पिकविमा बाबत त्यांच्याशी चर्चा केली. आठ दिवसात शेतकऱ्यांना पैसे न मिळाल्यास तीव्र आंदोलन छेडू, त्यामुळे होणाऱ्या परिणामाला सामोरे जाण्यास तयार राहा असा दम देखील रविकांत तुपकरांनी यावेळी अधिकाऱ्यांना भरला. शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर आक्रमकपणे लढा देणारे शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी पुणे येथील कृषी आयुक्त कार्यालयात धडक देत पिक विम्याचा प्रश्न चांगलाच लावून धरला. पिकविमा आणि नुकसान भरपाईसाठी रविकांत तुपकर सातत्याने लढा देत आहेत. अगदी गल्लीपासून ते मुंबईपर्यंत त्यांनी आक्रमक आंदोलने केली आहेत. गेल्या महिन्यातच त्यांनी कृषी अधीक्षक कार्यालयात मुक्काम आंदोलन केले होते. त्यानंतर त्यांनी पुन्हा निवेदनाच्या माध्यमातून पिक विम्याचा पाठपुरावा केला. त्यानंतर पुन्हा आक्रमक होत. ६ जानेवारी रोजी बुलढाणा जिल्हा कृषि अधीक्षक कार्यालयात शेतकऱ्यांसह धडक देत ३ तास ठिय्या मांडला होता. त्यावेळी कृषिमंत्री मा.ना. ॲड.माणिकरावजी कोकाटे यांच्याशी फोनवरून संवाद साधत तातडीने शेतकऱ्यांना पिकविमा देण्याची मागणी केली. यावर कॅबिनेटमध्ये पिकविम्याच्या विषयावर निर्णय घेण्याचे आश्वासन कृषिमंत्र्यांनी दिले हते. शिवाय राज्याचे कामगार मंत्री आकाश फुंडकर यांच्याशी देखील त्यांनी पिक विम्याबाबत चर्चा करून शासन दरबारी हा प्रश्न लावून धरण्याची मागणी केली होती. त्यानंतर आता आज १७ जानेवारी रोजी रविकांत तुपकरांनी थेट पुणे येथील कृषी आयुक्त कार्यालयात धडक दिली. राज्याचं पिक विमा कंपन्यांचे काम पाहणारे मुख्य सांख्यिकी यांची भेट घेऊन त्यांनी पिक विम्याबाबत चर्चा केली. बुलढाणा जिल्ह्यात पिकविमा कंपनीने गेल्या वर्षीच्या रब्बी हंगामातील पोस्ट हार्वेस्टिंग अंतर्गत पात्र असलेल्या व चुकीचे कारण दाखवून अपात्र केलेल्या १ लाख २६ हजार २६९ शेतकऱ्यांना अद्याप पिकविम्याचा मोबदला दिला नाही. त्याचबरोबर खरीप हंगामात चुकीचे कारण देवून अपात्र केलेल्या ७० हजार ८३१ शेतकऱ्यांना पिकविमा देण्याचे कंपनीने मान्य केले आहे. त्या शेतकऱ्यांनाही कंपनीने अद्याप पिकविम्याचा मोबदला दिला नाही. पिकविम्यापोटी जिल्ह्यातील शेतकऱ्यांना २३३ कोटी ८३ लक्ष रु. रक्कम मिळणे अद्याप बाकी आहे त्यामुळे बुलढाणा जिल्ह्यातील या शेतकऱ्यांची तसेच राज्यातील ज्या शेतकऱ्यांचे पीक विम्याची रक्कम बाकी आहे. त्यांची रक्कम तातडीने शेतकऱ्यांना मिळावी, अशी आमची आग्रही मागणी आहे. परंतु



शासनाकडून उर्वरित हिस्सा मिळाल्यानंतरच या वंचित शेतकऱ्यांची पिकविमा रक्कम जमा करू, असे कंपनीकडून सांगितले जात आहे. त्यामुळे शासनाकडे बाकी असलेला कंपनीचा हिस्सा उपलब्ध करून देत वंचित शेतकऱ्यांना तातडीने पिक विमा रक्कम देण्यासाठी कंपनीला बाध्य करावे, अशी मागणी रविकांत तुपकरांनी आक्रमकपणे मांडली. राज्यातील ज्या जिल्ह्यांमध्ये पिक विम्याचे दावे कमी आलेले आहेत ज्या जिल्ह्यांचे टार्गेट पूर्ण झालेले नाहीत अशा जिल्ह्यांमधून शासनाकडे पैसे रिफंड केले जातात. या रिफंड झालेल्या पैशांमधून शेतकऱ्यांची ही रक्कम अदा करण्याचा प्रस्ताव आपण शासनाकडे सादर करणार असल्याचे मुख्य सांख्यिकी यांनी रविकांत तूपकर यांना सांगितले. आठ दिवसांमध्ये जर शेतकऱ्यांच्या खात्यात पीक विम्याची रक्कम जमा झाली नाही तर आक्रमक आंदोलन उभारले जाईल त्यामुळे होणाऱ्या परिणामाला सामोरे जाण्यासाठी तयार राहा असा सज्जड दम यावेळी रविकांत तुपकरांनी सदर अधिकाऱ्यांना भरला.यावेळी राम अंभोरे,सचिन पांडूळे,संदीप पवार यासह शेतकरी उपस्थित होते.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# सहकार विद्या मंदिरमध्ये सशस्त्र सेना माजी सैनिक दिवस उत्साहात साजरा



**जनसंचलन/बुलढाणा**

सहकार विद्या मंदिर या सी.बी. एस.ई. मान्यता प्राप्त शाळेत राष्ट्रीय छात्र सेनेच्या वतीने मंगळवार दि.१४/०१/२०२५ रोजी सशस्त्र सेना माजी सैनिक दिवस मोठा उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी सैन्यातील निवृत्त जवानांच्या योगदानाचा सन्मान करण्यासाठी, देशाच्या रक्षणासाठी बलिदान देणाया सैनिकांचा सन्मान करणे, माजी सैनिकांच्या कुटुंबियांच्या पाठीशी उभे राहणे या हेतूने दरवर्षी विद्यालयात हा दिवस साजरा करण्यात येतो. कर्नल ओमेश शुक्ला, १३ महाराष्ट्र बटालियन, खामगांव यांच्या मार्गदर्शनाखाली हा सहकार विद्या मंदिर, बुलढाणा येथे सशस्त्र सेना माजी सैनिक दिवस साजरा करण्यात आला. यावेळी बुलढाणा अर्बन चॅरीटेबल सोसायटीच्या अध्यक्षा सौ.कोमल झंवर, प्राचार्य, मुख्याध्यापीका, एन.सी.सी. ऑफीसर श्री.राजू हिवाळे व एन.सी.सी. कॅडेट यांच्या उपस्थितीमध्ये निवृत्त माजी सैनिकांच्या देशसेवेचा, राष्ट्रसेवेचा गौरव करण्यात आला. यावेळी निवृत्त जवानांमध्ये हवालदार अनिल डोंगरदिवे यांनी उपस्थित कॅडेटला मोलाचे मार्गदर्शन केले व आपले देशसेवा करीत असतांनाचे अनुभव कॅडेटला सांगितले. माजी सुभेदार मेजर अजाबराव जाधव, हवालदार सिध्दार्थ मिसाळ, हवालदार विजय राऊत, हवालदार गुलाबराव मिसाळ आदी निवृत्त जवान उपस्थित होते.

# जिल्हा रुग्णालयात राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रम संपन्न

**जनसंचलन/बुलडाणा**

मराठवाडा ग्रामीण विकास संस्था छत्रपती संभाजीनगर, पोलीस अधिक्षक कार्यालय बुलढाणा व जिल्हा तंबाखू नियंत्रण कक्ष जिल्हा रुग्णालय बुलढाणा यांच्या संयुक्त विद्यमाने प्रभा हॉल पोलीस मुख्यालय येथे पोलीस अधिकारी व तालुका आरोग्य अधिकारी यांची एकदिवसीय कार्यशाळा संपन्न झाली. जिल्हा पोलीस अधीक्षक विश्व पानसरे व जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. भागवत भुसारी यांच्या मार्गदर्शनाखाली ही कार्यशाळा पार पडली. या कार्यशाळेस प्रमुख मार्गदर्शक मराठवाडा ग्रामीण विकास संस्थेचे प्रकल्प संचालक अप्पासाहेब उगले, डॉ. निकिता गायकवाड व राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रम जिल्हा रुग्णालय बुलढाणा येथील अर्चना आराख, मानसोपचार तज्ञ डॉ.कुणाल शेवाळे उपस्थित होते. अप्पासाहेब उगले यांनी कलम ४ (कोटपा) कलम ६ अ ६ ब त्याचप्रमाणे कलम ५,७,८,९ बाबत मार्गदर्शन केले. डॉ. निकिता गायकवाड यांनी मौखिक आरोग्यबाबत मार्गदर्शन केले. अर्चना आराख यांनी तालुकास्तरीय समन्वय समितीची भुमिका, रुग्णालयातील सोयीसुविधा व जबाबदारी याविषयी माहिती दिली. डॉ. कुणाल शेवाळे यांनी मानसिक आजार, व्यसन व उपचार यावर सविस्तर मार्गदर्शन केले. या कार्यशाळेकरिता पोलिस निरिक्षक/उपनिरिक्षक तालुका आरोग्य अधिकारी उपस्थित होते. या कार्यशाळेकरिता पोलिस निरिक्षक/उपनिरिक्षक तालुका आरोग्य अधिकारी उपस्थित होते. या कार्यशाळेचे सुत्रसंचालन अनिल गुजे यांनी केले व आभार अर्चना आराख यांनी मानले. या कार्यशाळेकरिता मराठवाडा ग्रामिण विकास संस्थेचे अनिल गुजे राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रम जिल्हा सल्लगार / समुपदेशक श्री लक्ष्मण सरकटे यांनी परिश्रम घेतले




# कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासून संरक्षणासाठी तक्रार समिती बंधनकारक

**जनसंचलन/बुलढाणा**

कामाच्या ठिकाणी महिलांच्या लैंगिक छळास प्रतिबंध करण्यासाठी सर्व शासकीय /निमशासकीय कार्यालयात व इतर खाजगी क्षेत्र, इंन्टप्रायजेस, सहाकरी संस्था, क्रीडा संकुले, प्रेक्षागृहे, मॉल्स, अशासकीय संघटना, ट्रस्ट, रुग्णालये, शुश्रुषालेय. वाणिज्य, शैक्षणिक, औद्योगिक कार्यालय, संस्थेत इत्यादी १० पेक्षा जास्त कर्मचारी असल्यास अंतर्गत तक्रार निवारण समिती गठीत करणे बंधनकारक केले आहे. अंतर्गत समिती स्थापन न करणाऱ्या कार्यालयांचे लायसन्स रद्द किंवा व्यवसाय पुढे सुरु ठेवण्यास मज्जाव करण्यात येईल. अंतर्गत तक्रार समितीमध्ये किमान ५ सदस्य असावेत. समितीची अध्यक्षा महिलाच असावी, समितीमध्ये ५० टक्के पेक्षा जास्त महिलांचा समावेश असावा व एका अशासकीय सदस्याचा समावेश करण्यात यावा. कामाच्या ठिकाणी महिलांच लैंगिक छळापासून संरक्षण (प्रतिबंध, मनाई व निवारण) अधिनियम २०१३ मधील कलम २६ नुसार जर एखाद्या मालकाने (अ) अंतर्गत तक्रार समिती स्थापन केली नाही (ब) कलम १३,१४,२२ नुसार कारवाई केली नाही (क) या कायद्यातील व नियमातील विविध तरतुदींचे व जबाबदाऱ्यांचे पालन न केल्यास मालकाला ५० हजार रुपयापर्यंत दंड होईल तसेच हाच प्रकार पुन्हा केल्यास लायसन्स रद्द, दुप्पट दंड अशी तरतूद आहे. सदर अधिनियमाची प्रभवी अंमलबजावणी व कार्यवाही करण्यासाठी १० पेक्षा जास्त कर्मचारी असलेल्या सर्व शासकीय व निमशासकीय तसेच खाजगी आस्थपना यांनी आपल्या कार्यालया अंतर्गत तक्रार समिती दि. २७ जानेवारी २०२५ पर्यंत गठित करुन तसा फलक कार्यालयाचे दर्शनी भागात लावण्यात यावे. सदर कामास प्रथम प्राधान्य देण्यात यावे. अन्यथा दंडात्मक कार्यवाही करण्याचे निर्देश मा. जिल्हाधिकारी यांनी दिलेले आहेत. तरी सर्व कार्यालयांमध्ये तात्काळ अंतर्गत तक्रार समिती गठित करण्यात येवून तसा अहवाल जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी बुलढाणा यांचेकडे dwcdo.bul.@gmail.com / dwcd_bul@yahoo.com या मेलवर सादर करावा. असे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी अमोल डिघुळे बुलढाणा यांनी केले आहे.

# सोमवारी होणार महिला लोकशाही दिन




**जनसंचलन/ खामगाव**

दर महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी महिला लोकशाही दिन घेण्यात येतो. जानेवारी महिन्याचा महिला लोकशाही दिन सोमवार , दि. २० जानेवारी २०२५ रोजी सकाळी ११ वाजता निवासी उपजिल्हाधिकारी यांच्या कार्यालयात घेण्यात येणार आहे. शासन निर्णयानुसार जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिन प्रत्येक महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी आयोजित करण्यात येतो. त्याअनुषंगाने महिला लोकशाही दिन घेण्यात येणार आहे, असे महिला व बालविकास अधिकारी अमोल डिघुळे यांनी कळविले आहे.

# समृद्धीवर काल यमदूत आडवा आला होता पण..!

**जनसंचलन/बुलढाणा**

स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्ग होणाऱ्या अपघातांमूळे कुप्रसिध्द झालाय. या समृद्धी महामार्गावर अनेक वेळा यमदूतआडवा येत असल्याने भीषण अपघात होऊन अनेकांना प्राण गमवावे लागत आहेत.तर अपंगत्व येऊन शेकडो जण खाटेवर निपचित पडून आहेत. १६ जानेवारी रोजी चॅनल नंबर ३२६.२ नागपूर कॅरिडोर वर कार क्रमांक १२--५९०१ चे चालक संकरित श्रीनिवास रेड्डी वय २३ वर्ष रा अंधेरी ,मुंबई हे मुंबईवरून लग्न समारंभासाठी नागपूरच्या दिशेने जात असताना सदर ठिकाणी कुत्रा आडवा आल्याने चालकाचे कार वरील नियंत्रण सुटल्याने कार अक्षरशा मिडीयम लेन कडून साईड बॅरिअरपर्यंत दोन्ही साईडला धडकली. यामध्ये सर्व प्रवासी यांनी सीट बेल्ट लावेल असल्यामुळे समोरील एअर बॅग उघडल्यामुळे प्राणहानी टळली परंतु कारचे अक्षरशः समोरील एक्सेल सहित दोन्ही चाके तुटून बाजूला झाली व पाठीमागून सुद्धा मोठ्या प्रमाणात नुकसान झाले.दैव बलवत्तर म्हणून यामध्ये श्लोक कोळमकर वय २४ वर्ष व पुष्पेन्द्र गुप्ता व २७ वर्ष हे गंभीर जखमी झाल्याने त्यांना ताबडतोब समृद्धी महामार्गावरील रुग्णवाहीकेचे डॉक्टर शरद शेळके व चालक दिगंबर शिंदे यांनी प्रथमोपचार करून सिंदखेडराजा ग्रामीण रुग्णालय येथे भरती केले. व सोबत असलेले मोनाली टोपाल व २८ वर्ष व चालक हे किरकोळ जखमी झाले. तसेच कारचे समृद्धी महामार्गावर इंजिनचे दोन तुकडे होऊन चाके बाजूला तुटून पडल्याने काही काळ वाहतूक हळू प्रमाणात सुरू ठेवून महामार्ग पोलीसचे पीएसआय जितेंद्र राऊत पोलीस हेडकॉन्स्टेबल विठ्ठल काळुसे, विजय आंधळे व महाराष्ट्र सुरक्षा बलचे गायकवाड व पवन सुरुशे व स्टॉप यांनी टीम चे श्रीकृष्ण बच्छीरे ,आदित्य गोपाळे, दिगंबर इंगोले, नितीन भिसेन यांच्या मदतीने अपघातग्रस्त कार महामार्गाच्या साईडला घेऊन टोईंग करून सुरक्षित ठिकाणी उभे केले.



व वाहतूक सुरळीत करण्यात आली. विशेष म्हणजे सध्या संपूर्ण महाराष्ट्रामध्ये दिनांक एक जानेवारी ते ३१ जानेवारी २०२५ पर्यंत मा.अप्पर पोलीस महासंचालक वाहतूक श्री सुरेश मेकला साहेब यांच्या आदेशाने व यशवंत सोळंके पोलीस अधीक्षक महामार्ग प्रादेशिक विभाग, नागपूर. यांच्या मार्गदर्शनाखाली रस्ता सुरक्षा अभियान राबवून महामार्गावर होणाऱ्या अपघाताबद्दल पोस्टर, भिंती पत्रके वाटप करून व इतर जनजागृती कार्यक्रम करण्यात येत आहे. तरी सर्व वाहनधारकांनी नियमाचे पालन करूनच वाहन चालवावे,असे आवाहन महामार्ग पोलीस चे प्रभारी अधिकारी श्री संदीप इंगळे हे करीत आहे.

# माती खाणाऱ्या व धुळफेक करणाऱ्या ६ जणांवर कारवाई!

## मोताळा तहसीलदार ॲक्शन मोडवर; ६ टिप्पर जप्त!



**जनसंचलन/मोताळा**

तहसीलदार हेमंत पाटील यांनी ॲक्शन मोडवर काम करत रस्त्यावर मातीने गच्च भरून वाहतूक करणाऱ्या ६ चाकी टिप्पर वाहनांवर कारवाई केली. हे टिप्पर इतके भरलेले होते की वाहतूक सुरू असतानाच माती रस्त्यावर पडत होती आणि मागील वाहनचालकांच्या डोळ्यांत माती जाऊन त्यांचा जीव धोक्यात येत होता. या अक्षम्य दुर्लक्षामुळे मोठा अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली होती. तहसीलदार पाटील यांनी तत्काळ पाऊल उचलत टिप्पर जप्त केले आणि तहसील कार्यालयात जमा केले. याप्रकरणी प्रादेशिक परिवहन विभाग बुलढाणा यांना माहिती दिली जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. हेमंत पाटील यांच्या या कारवाईने बेकायदेशीर वाहतूक करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली असून, रस्त्यांवरील सुरक्षिततेसाठी प्रशासनाचा हा धडाका नागरिकांमध्ये चर्चेचा विषय ठरला आहे.

# स्त्रियांच्या स्तन व गर्भाशयाच्या कर्करोगाबाबत रविवारी मार्गदर्शन शिबीर...

## राजर्षी शाहू मल्टिस्टेटचे आयोजन : शिबिराचा लाभ घेण्याचे संस्थाध्यक्षा मालती शेळके यांचे आवाहन

**जनसंचलन/बुलडाणा**

राजर्षी शाहू मल्टिस्टेटच्यावतीने स्त्रियांच्या स्तन व गर्भाशयाच्या कर्करोगाबाबत मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. येथील गर्दे वाचनालयाच्या सभागृहात १९ जानेवारी रोजी दुपारी तीन वाजता हे शिबीर होणार आहे. माता- भगिनींनी या मोफत मार्गदर्शन शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन संस्थाध्यक्षा मालती शेळके यांनी केले आहे. शिबिराचे उदघाटन ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या प्रा. शाहिनाताई पठाण यांच्या हस्ते होईल. अध्यक्षस्थानी राजर्षी शाहू मल्टिस्टेटचे संस्थापक अध्यक्ष संदीप शेळके राहणार आहेत. छत्रपती संभाजीनगर येथील एमजीएम हॉस्पिटलचे स्तन विकार तज्ञ आणि स्तन कर्करोग तज्ञ डॉ.आशुतोष तोंडारे, एमआयटी हॉस्पिटल रिसर्च इन्स्टिट्यूटच्या स्त्री रोग तज्ञ आणि स्त्री कर्करोग तज्ञ डॉ. शिल्पी वर्मा, आय बॉक केअर हॉस्पिटलच्या मुख कर्करोग तज्ञ डॉ. रचिता बाहेती तोंडारे प्रमूख मार्गदर्शन करणार आहेत. आरोग्य हीच खरी संपत्ती आहे. मात्र धावपळीच्या जीवनात सर्वांचेच कमीअधिक प्रमाणात आरोग्याकडे दुर्लक्ष होत आहे. कुटुंबाची जबाबदारी सांभाळत असतांना महिलांना स्वतःच्या आरोग्याकडे लक्ष द्यायला वेळ नसतो. त्यामुळे स्त्रियांमध्ये आजाराचे प्रमाण वाढत चालले आहे. पूर्वी ६० ते ७० वर्षे वयात होणारे आजार आज चाळीशीत किंबहुना त्याही पेक्षा कमी वयात जडत असल्याचे चित्र आहे. सध्या स्त्रियांच्या स्तन आणि गर्भाशयाच्या कर्करोगाबाबत जास्त तक्रारी येत आहेत. त्यामुळे या आजाराबाबत जनजागृती करण्यासाठी या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.



दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958